# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-०१** **दिनांक: ०१/०१/२०२४**

## ३१ डिसेंबर बंदोबस्तदरम्यान मिरा-भाईंदर, वसई-विरार वाहतुक पोलीस कडुन दारु पिवुन गाडी चालवणाऱ्यावर कारवाई.

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नवीन वर्षाचे स्वागतासाठी नागरिक मोठया प्रमाणावर ३१ डिसेंबर रात्री जल्लोष साजरा करीत असतात.त्याकरीता बरेच नागरिक रात्री उशीरा रस्त्यावर येत असल्याने मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय क्षेत्रामध्ये मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली बंदोबस्त व नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते.

मा.पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली एकुण ५ पोलीस उपआयुक्त, १० सहा.पोलीस आयुक्त, २२५ पेक्षा जास्त पोलीस अधिकारी व ७०० पेक्षा जास्त पोलीस अंमलदार, २४८ ट्रफिक वार्डन व ४०० मसुब चे कर्मचारी असा बंदोबस्त नेमण्यात आला होता. आयुक्तालयात ५० पेक्षा जास्त ठिकाणी नाकाबंदी आयोजन करण्यात आले होते.

३१ डिसेंबर रोजी रात्री बरेच नागरिक दारु पिवुन गाडी चालवित असतात तसेच वाहतुकीचे नियाकडे दुर्लक्ष करीत असतात त्याअनुशंगाने दारु पिवुन गाडी चालविणा-यावर मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडील वाहतुक शाखेकडुन १०४ जणावर कार्यवाही करण्यात आली आहे.

